NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / ११६/११५ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल:, registrar@sus.ac.in, eligibility@sus.ac.in



**पात्रता विभाग**

जा.क्र.पुअहोसोविसो/पात्रता विभाग/२०१९-२०/ 1575 — दि. 11 FEB 2020

प्रति,

मा. प्राचार्य/प्राचार्या,

१.सर्व सलंग्नित पदवी महाविद्यालये (बी.ए, बी.कॉम.,बी.एस्सी., बी.सी.ए., बी.एस्सी (सर्व शाखा), बी.बी.ए)

२. सर्व सलंग्नित व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर महाविद्यालये (अभियांत्रिकी, औषधनिर्माण शास्त्र, एम.बी.ए, वास्तुकलाशास्त्र, एम.सी.ए.,विधी, व शिक्षणशास्त्र)

विषय :- विद्यार्थ्यांच्या पात्रता अर्जातील त्रुटींची पुर्तता करण्यास मुदतवाढ दिल्याबाबत..

संदर्भ :- पात्रता परिपत्रक दि. १८ जून, २०१९ जा. क्र. पुअहोसोविसो/पात्रता विभाग/२०१९-२०/४७९१

महोदय/ महोदया,

संदर्भिय परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Admission या Link वर Eligibility या मथळयाखाली उपलब्ध करुन दिलेले असून कृपया त्याचे अवलोकन व्हावे.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पात्रता अर्जातील ऑनलाईनव्दारे कळविलेल्या त्रुटींची पूर्तता ३१ जानेवारी, २०२० पर्यंत करण्याच्या सुचना संदर्भाधीन परिपत्रक च्या बाब क्र. १३ (अ) आणि (ब) नुसार कळविण्यात आल्या होत्या. परंतु चालू शैक्षणिक वर्ष २०१९-२० शासनाच्या सामाईक प्रवेश प्रक्रियेनुसार विद्यार्थ्यांची यादी काही महाविद्यालयांनी पडताळणी करून प्रस्तुत विभागाकडे जमा केलेली नाही.तसेच चालू शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये बी.ए, बी.कॉम.,बी.एस्सी., बी.सी.ए., बी.एस्सी ई.सी.एस., बी.बी.ए. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून डेटा पडताळणी करुन घेण्यात आलेला आहे. डेटा मॅच झालेल्या विद्यार्थ्यांची पात्रता अंतिम करण्याबाबतचे व डेटा मॅच न झालेल्या विद्यार्थ्यांचा डेटा प्रस्तुत विभागास देण्यास विलंबाने प्राप्त झालेला आहे. सदर डेटाची मॅन्युवली पडताळणी करुन त्रुटी विभागीयस्तरावर चालु आहे. पात्रता त्रुटी पूर्ततेसाठी आदेशान्वये खालील प्रमाणे मुदत वाढ देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम | मुदतवाढ देण्यात आलेल्या तारखा |
|---|---|---|
| १. | बी.ए,बी.कॉम.,बी.एस्सी.,बी.सी.ए., बी.एस्सी (All Branch), बी.बी.ए. | २९ फेब्रुवारी, २०२० |
| २. | अभियांत्रिकी, विधी, व शिक्षणशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुकलाशास्त्र, एम.बी.ए., एम.सी.ए. | १३ मार्च, २०२० |

तरी संबंधित महाविद्यालयांनी विद्यापीठाकडून ऑनलाईन माध्यमातून कळविलेल्या त्रुटींची पुर्तता (बी.ए,बी.कॉम.,बी.एस्सी.,बी.सी.ए., बी.एस्सी ई.सी.एस., बी.एस्सी.(Entrepreneurship), बी.एस्सी.(Bio Tech), बी.बी.ए.अभ्यासक्रमाच्या) वाढवून दिलेल्या मुदतीमध्ये म्हणजेच दि. २९ फेब्रुवारी, २०२० व

(अभियांत्रिकी,विधी, व शिक्षणशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र,वास्तुकलाशास्त्र,एम.बी.ए., एम.सी.ए. अभ्यासक्रमाच्या) १३ मार्च, २०२० रोजीच्या आत विभागात जमा करण्याची योग्य ती नोंद घ्यावी. जे महाविद्यालय मुदतवाढ दिलेल्या मुदतीमध्ये त्रुटींची पूर्तता करणार नाहीत, अशा महाविद्यालयांकडून प्रति विद्यार्थी रु.५००/- प्रमाणे दंडाची रक्कम आकारुनच संबंधित विद्यार्थ्यांच्या पात्रता कायम करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

कळावे.

आपला विश्वासु

(प्रा.व्ही.बी. घुटे)
कुलसचिव

प्रत :

१. पी.जी.प्रवेश विभाग
२. संलग्नता विभाग
३. परीक्षा विभाग ( संगणक केंद्र)
४. ई- सुविधा विभाग
५. एम.के.सी.एल. विभाग
६. वित्त व लेखा विभाग